नि.फौ.ख.क्र. ७२/२०२५

निशानी क्र.४१

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी शपथेपर सूरु :–**

माझे नाव – **आसमा इस्माईल मुलानी,**

वय – २८ वर्ष, व्यवसाय – घरकाम,

राहणार – आलमला, ता. औसा, जि. लातूर.

**अभियोगपक्षातर्फे अभियोक्ता श्री. ए.एन. निळेकर यांचेमार्फत :–**

**१.** मी आरोपींना ओळखते. आरोपी क्र.१ हा माझा पती असुन आरोपी क्र.२ ते ४ हे माझ्या पतीचे नातेवाईक आहेत. असे काही घडले नाही की, आरोपींनी घर खर्चासाठी तुझ्या माहेरहुन पैसे आण म्हणुन माझा छळ केला. आता मला मी दिलेली फिर्याद दाखविण्यात आली, त्यावर माझी सही आहे. परंतु त्यातील मजकुर मला सांगता येत नाही.

**साक्षीदार सरकार पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी वकीलांचे तोंडी विनंती वरुन उलट तपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३१/०३/२०१५ रोजी लग्नानंतर सहा महिन्यांनंतर आरोपींनी आपसात संगनमत करुन मला 'घर खर्चासाठी तुझ्या माहेरहुन पैसे आण म्हणुन' म्हणुन सतत शिवीगाळ करुन शारीरिक व मानसिक छळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन जाचजुलूम करुन चारित्र्यावर संशय घेवुन घरातुन हाकलुन दिले जिवे मारण्याची धमकी दिली. आता मला आता माझ्या फिर्यादमधील अधोरेखांकित भाग–अ वाचुन दाखविण्यात आला. सदर मजकुर पोलिसांनी माझ्या फिर्यादमध्ये का नमुद केला आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आणि माझ्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमची आपसात तडजोड झाली असल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आय.जे. बागवान यांनी नाकारला.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by
PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.06.09
16:08:37 +0530

दिनांक – ०९/०६/२०२६.

**(श्री. आवटे पी. पी.)**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, औसा.**

नि.फौ.ख.क्र. ७२/२०२५

निशानी क्र.४२

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी शपथेपर सूरु :–**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | **सलीम बाबुलाल शेख,** |
| वय | – | ३४ वर्ष, व्यवसाय – मजुरी, |
| राहणार | – | सेलु, ता. औसा, जि. लातूर. |

**अभियोगपक्षातर्फे अभियोक्ता श्री. ए.एन. निळेकर यांचेमार्फत :–**

१. मी आरोपींना ओळखतो. आरोपी क्र.१ हा माझ्या बहीणीचा पती असुन आरोपी क्र.२ ते ४ हे माझ्या बहीणीच्या पतीचे नातेवाईक आहेत. असे काही घडले नाही की, आरोपींनी घर खर्चासाठी तुझ्या माहेरहुन पैसे आण म्हणुन माझ्या बहीणीचा छळ केला. आता मला मी दिलेला जबाब दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे. परंतु त्यातील मजकुर मला सांगता येत नाही.

**साक्षीदार सरकार पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी वकीलांचे तोंडी विनंती वरुन उलट तपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३१/०३/२०१५ रोजी लग्नानंतर सहा महिन्यांनंतर आरोपींनी आपसात संगनमत करुन माझ्या बहीणीला 'घर खर्चासाठी तुझ्या माहेरहुन पैसे आण म्हणुन' म्हणुन सतत शिवीगाळ करुन शारीरिक व मानसिक छळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन जाचजुलूम करुन चारित्र्यावर संशय घेवुन घरातुन हाकलुन दिले जिवे मारण्याची धमकी दिली. आता मला आता माझ्या जबाबमधील अधोरेखांकित भाग–अ वाचुन दाखविण्यात आला. सदर मजकुर पोलिसांनी माझ्या जबाबमध्ये का नमुद केला आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आणि आमच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमची आपसात तडजोड झाली असल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आय.जे. बागवान यांनी नाकारला.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.06.09 16:08:45 +0530

दिनांक – ०९/०६/२०२६.

**(श्री. आवटे पी. पी.)**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, औसा.**